# 'ठक्कर्स' समूहातर्फे रोपवाटप

■ नाशिक । दि. ७ प्रतिनिधी

ठक्कर्स उद्योग समूहातर्फे 'मिशन प्लॅन्टेशन' योजनेंतर्गत क्रेडाई व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण नाशिक शहरात वृक्षलागवड, रोपांचे वाटप व संगोपन यासंबंधी एक विशेष कार्यक्रम ठक्कर्स बझार येथे झाला. ठक्कर्स समूहातर्फे १५ ऑगस्टपर्यंत रोपांचे मोफत वाटप ठक्कर्स बझार येथे तसेच त्र्यंबकरोडवर पीटीसीसमोर ठक्कर्स डोम येथे इंडिगो पार्क, गोविंदनगर येथे सुरू आहे.

यावेळी बोलताना ठक्कर्स समूहाचे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांनी सांगितले की, ठक्कर्स उद्योग समूहाला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त एक लाख झाडे लावण्याचा आम्ही दोन वर्षांपूर्वी संकल्प केला होता. त्यापैकी ३५ हजार झाडांची लागवड आतापर्यंत पूर्ण झाली आहे. बाकी झाडांच्या लागवडीचे काम जोमाने पुढे चालवले जात आहे. यापैकी काही झाडे 'एक व्यक्ती एक झाड' या तत्त्वावर लावून त्याचे संगोपन सध्या सुरू आहे. जी व्यक्ती झाड लावेल त्या व्यक्तीने प्रत्येक महिन्यात त्याच्या त्याच्या वाढदिवसाच्या तारखेला त्या झाडाला सहकुटुंब भेट देऊन आपले त्या झाडाबरोबरचे स्नेहाचे नाते जोपासावे, अशी संलकल्पना




ठक्कर समूहातर्फे ठक्कर बझार बसस्थानकात मोफत रोपवाटप उपक्रम शुभारंभप्रसंगी संचालक जितेंद्र ठक्कर, राजेंद्र ठक्कर, संजय लचके, प्रवीण पाटील, किरण चव्हाण, पी.एन.पाटील, यामिनी जोशी, जयेश ठक्कर, सुनील गावंडे आदी.

आहे. एस.टी. विभाग नियंत्रक यांनी महामंडळातर्फे ग्रीन एसटी स्टॅण्डबरोबरच एक व्यक्ती एक झाड हा उपक्रमदेखील राबवण्यात येईल, असे सांगितले. याप्रसंगी बोलताना सामाजिक वनीकरणाचे उपसंचालक पी.एन.पाटील यांनी हरित महाराष्ट्र अभियान तसेच रोप उपलब्धतेची माहिती दिली. या कार्यक्रमास क्रेडाई नाशिकचे अध्यक्ष जयेश ठक्कर, माजी अध्यक्ष किरण चव्हाण, सुनील गावंडे, अमित रोहमारे तसेच सामाजिक वनीकरण विभागाचे सहायक संचालक प्रवीण पाटील, संजय लचके आदी उपस्थित होते.